**नियमित फौजदारी केस नं. ५०/२०१७**
**नि. क्र. ४२**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ दिपक कृष्णा झिमन यांचा उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एम. एम. जाधव यांच्याकडून</u> –**

**०५.** मला कला शाखेचा पदवीधर आहे. कोऱ्या स्टँप पेपरवर सही करुन द्यायची नाही, हे मला माहित आहे, साक्षीदार सांगतो की, कार्यालय बंद होत आहे लवकर–लवकर सही करुन द्या असे आम्हाला आरोपीने सांगितले होते. 'कोणते कार्यालय' याबाबत आरोपीने सांगीतले नव्हते, हे खरे आहे. आरोपीने कोरे बॉड घेतल्याबाबत मी आरोपीविरुध्द तक्रार केली असे काही घडले नाही.

**०६.** आरोपीला रक्कम दिल्याबाबत त्याने पावती दिली नव्हती. रक्कम कशासाठी हवी हे कर्ज काढतेवेळी नमूद केले होते काय हे मला माहित नाही. तुम्हाला नोकरीला लावून देतो असा काही कागद आरोपीने मला दिला नव्हता. मी स्वतः आरोपीस पैसे दिले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने आरोपीला किती रक्कम दिली हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर मी फिर्यादीच्या सांगण्यावरुन सांगितला आहे.

**०७.** ''मी ते कागद मुंबईहून घेवून आलो'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले होते. ''मी कळंबस्ते गावी आलो असे'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले होते. ''कळंबस्ते हे माझे व विनायकचे गाव आहे'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले होते.

**०८.** ''विनायक गावीच होता'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ''मी २५/१०/२०१४ रोजी गावी आलो होतो, मला विनायक याचा फोन २४ तारखेला रात्री आला होता'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना

सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ''मी दिनांक २५/१०/२०१४ रोजी सकाळी फ्रेश होवून मी, विनायक व काका सोमा असे आम्ही रत्नागिरी येथे रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँक येथे गेलो''असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ''त्या बँकेत सोमा रत्नू कानसे यांनी त्यांचे ब्रासलेट, अंगठी व इतर दागिने गहान ठेवून त्या बँकेतून रक्कम रुपये १,२१,०००/– रोखीने घेतली'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ''ती रक्कम घेवून आम्ही तिघे रत्नागिरी येथे आनंद वेंगुर्लेकर यांच्या घरी पोहोचलो'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ''आम्ही ती रक्कम आनंद याच्या घरी आनंद याच्या हाती दिली'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ''त्यावर आनंद वेंगुर्लेकर यांनी काका सोमा रत्नू कानसे यांना तेथेच थांबिवले व मला तसेच विनायकला स्कूटीवरुन कलेक्टर ऑफीसमध्ये नेले'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ''तेथे वेंगुर्लेकर यांनी मी व विनायक असे आमच्या नावे चार स्टँप पेपर घेतले'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ''तेथे वेंगुर्लेकर यांनी कोऱ्या स्टँप पेपरवर आमच्या सहया घेतल्या'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ''ते पेपर कोरे असल्यामुळे त्याबाबत आम्ही आरोपीला विचारले'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ''लवकर–लवकर सहया करा तुमचे काम होत आहे असे आरोपीने आम्हाला सांगितले'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ''आनंद वेंगुर्लेकर हे स्टँप पेपर घेवुन पुढे गेले व आम्हाला तेथेच थांबायला सांगितले'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ''आरोपीने

मला मुंबईला जाण्यास सांगितले होते व ऑर्डर आल्यास कॉल करतो असेही सांगितले होते'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ''मी दर तीन–चार दिवसांनी आनंद वेंगुर्लेकर यांना कॉल करीत होतो, ते कॉल उचलत नसत ते टाळा–टाळ करीत असत'' असे मी टिपण देतेवेळी पोलीसांना सांगितले नव्हते.

**०९.** आनंद वेंगुर्लेकर याला फिर्यादीने माझ्यासमक्ष रक्कम दिली याबाबतचा साक्षीदार म्हणून मी कोणत्याही कागदावर सही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादीकडून कधीही रक्कम घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला किंवा विनायकला नोकरीला लावतो असे आरोपीने आम्हाला कधीही सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी विनायक याच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटाच आहे.

**उलतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2025.02.21 18:06:55 +0530

(ब. द. तारे)

**दिनांक २१/०२/२०२५** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख**

-:CERTIFICATE:-

Judgment/order/evidence in R.C.C. No. 50/2017

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date | :- | 21/02/2025 |
| evidence signed by PO. on | :- | 21/02/2025 |
| evidence uploaded on | :- | 21/02/2025 |